# सुचना

## नाशिक ग्रामीण पोलीस भरती - २०१७
## लेखी परिक्षेचा निकाल

---

नाशिक ग्रामीण आस्थापनेवरील पोलीस भरती - २०१७ ची लेखीपरीक्षा दिनांक १६/०४/२०१७ रोजी सकाळी ०७:३० ते ०९:०० या वेळेत पोलीस मुख्यालय, नाशिक ग्रामीण, आडगांव येथे घेण्यांत आलेली आहे. सदर परीक्षेसाठी एकुण १५१८ पात्र उमेदवारापैकी १०४९ उमेदवार हजर राहीले होते.

पात्र उमेदवारांना मैदानी चाचणीत मिळालेले गुण व लेखी परीक्षेत मिळालेले गुण यांची बेरीज करण्यांत येवुन त्यांनुसार गुणवत्ता यादी तयार करण्यांत आलेली आहे. सदरची गुणवत्ता यादी ही पोलीस अधीक्षक कार्यालयाचे बाहेर संरक्षक भिंतीलगत, आडगांव येथे तसेच www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व नाशिक ग्रामीण घटकाचे संकेतस्थळांवर www.nashikruralpolice.gov.in येथे उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

निकाल जाहिर झाल्यानंतर ४८ तासाचे आत जर कोणत्याही उमेदवारास उत्तर पत्रिकेतील गुणांबद्दल शंका असेल व तक्रार केल्यास उत्तरपत्रिकेची पुर्न:तपासणी कार्यालय अधीक्षक ना.ग्रा/पोलीस उप अधीक्षक,(मुख्या.) नाशिक ग्रा. यांचेकडे केली जाईल. त्यासाठी समक्ष हजर राहुन लेखी स्वरुपात अर्ज करावा व तो स्किारण्यात येईल व त्या करीता उमेदवाराकडून रू. २००/- इतकी अतिरिक्त फी आकारण्यात येईल.

यासंबंधी सदर तपासणी करीता कार्यालय अधीक्षक ना.ग्रा/ पोलीस उप अधीक्षक(मुख्या.), नाशिक ग्रमीण यांना प्राधिकृत करण्यांत आलेले असल्याने त्यांचा निर्णय अंतिम राहील. ४८ तासानंतर उमेदवारांची विंनती अमान्य करण्यांत येईल.

या सर्व प्रक्रियेनंतर जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येनुसार निवड यादया हया मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे व भरती निकषांची पुर्तता यांच्या आधीन राहुन तयार करण्यात येवुन प्रसिध्द करण्यात येतील .

**ठिकाण :- नाशिक ग्रामीण.**

**दिनांक :- १७/०४/२०१७**

**( अंकुश शिंदे )**
**पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.**

Scanned by CamScanner